# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date 12 July 2025

## Time 11.00 to 11.05 AM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १२ जूलै २०२५ सकाळी ११.०० वाजता

****

पंतप्रधान  नरेंद्र मोदी आज दूरदृश्यप्रणाली द्वारे विविध सरकारी विभागांतल्या नव्यानं नियुक्त झालेल्या ५१ हजारांहून अधिक युवकांना नियुक्ती पत्रांचं वितरण करत आहेत. हा १६वा रोजगार मेळा देशभरात ४७ ठिकाणी आयोजित करण्यात आला आहे. नवीन भरती केलेले युवक रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य-कुटुंब कल्याण, कामगार-रोजगार, पोस्ट यासह अन्य विभागांमध्ये सामील होतील. देशभरात १५ रोजगार मेळाव्यांद्वारे आजवर १० लाखांहून अधिक नियुक्ती पत्रं जारी करण्यात आली आहेत.

****

महाराष्ट्र राज्य उच्च आणि तांत्रिक सामायिक प्रवेश परीक्षा एमएचटीसीईटी सुरळीत पार पडावी, यासाठी राज्यातील तंत्रनिकेतन अभियांत्रिकी पदविका महाविद्यालयांना संगणक आणि फर्निचर पुरवण्यात आलं आहे. त्यामुळे आता एमएचटीसीईटीच्या परीक्षा पॉलिटेक्निक इंजिनियरिंग महाविद्यालयामध्ये घेतल्या जात आहेत, अशी माहिती उच्च तथा तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी काल विधानपरिषदेत दिली. राज्यात झालेल्या या परीक्षेत चुकांसंदर्भात सदस्य अभिजीत वंजारी यांनी प्रश्न उपस्थित केला होता. या प्रश्नाचे उत्तर देताना मंत्री पाटील बोलत होते.

एमएचटी-सीईटीच्या २७ एप्रिल २०२५ रोजी झालेल्या, २८ व्या सत्रातील परीक्षेच्या प्रश्न पत्रिकेत २१ प्रश्नांमध्ये त्रुटी आढळून आल्या असून यासाठी उत्तरदायी असलेल्या तीन सदस्यीय समितीची सेवा खंडित करण्यात आली आहे, आता विभागाकडून, सीओईपी तंत्रशास्त्र विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुनील भिरुड यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांची कार्यकक्षा प्रश्नपत्रिका संच बनवणे, तज्ज्ञांची नियुक्ती आदी जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे. २७ एप्रिलच्या परीक्षेला २७ हजार ८२६ विद्यार्थी बसले होते, त्यांची फेर परीक्षा घेण्यात आल्याची माहितीही मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिली.

****

महाराष्ट्र वैद्यकीय परिषद, एमएमसीने होमिओपॅथी डॉक्टरांची नोंदणी करण्याचा निर्णय रद्द केला आहे. या निर्णयाला डॉक्टरांच्या संघटनांनी तीव्र विरोध दर्शवला होता. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने होमिओपॅथी डॉक्टरांना एक वर्षाचा `आधुनिक औषधनिर्माणशास्त्र प्रमाणपत्र अभ्यासक्रम`–सीसीएमपी पूर्ण केल्यानंतर, ॲलोपॅथीचा सराव करण्याची आणि महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेत नोंदणी करण्याची परवानगी देण्याचा निर्णय घेतला होता. या संदर्भात ३० जून रोजी अधिसुचनाही जारी केली होती, मात्र पुढील सूचना येईपर्यंत अशा डॉक्टरांची नोंदणी निलंबित राहील, असे महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेने जारी केलेल्या निवेदनात म्हटले आहे.

****

भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणानं पथकरांची वसुली सुरळीत करण्यासाठी फास्टॅग्जविषयीच्या तक्रारी नोंदवण्याचे निर्देश पथकर वसुली करणाऱ्या संस्थांना दिले आहेत. गाडीच्या दर्शनी भागात फास्टॅग लावणं गरजेचं असताना काही जण हातातून तो दाखवत असल्याचं निदर्शनाला आलं आहे. त्यामुळे टोलवसुलीसाठी वेळ लागतो. या प्रकाराला आळा घालण्यासाठी प्राधिकरणानं तक्रार दाखल करण्याचे निर्देश दिले असून अशा तक्रारीत नमूद असलेल्या फास्टॅग धारकांना काळ्या यादीत टाकलं जाईल, असं केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या निवेदनात म्हटलं आहे.

****

राज्य मंत्रिमंडळानं पशुसंवर्धन व्यवसायास कृषी समकक्ष दर्जा देण्याचा महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. असा दर्जा देणारं महाराष्ट्र हे देशातील पहिलं राज्य ठरलं आहे. या निर्णयानुसार पशुधनावर आधारित सर्व व्यवसाय आता कृषी व्यवसायाच्या समकक्ष मानले जातील, अशी घोषणा पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी काल विधीमंडळात केली. या धोरणात्मक सुधारणेमुळे दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, शेळीपालन आणि वराहपालन व्यवसाय करणाऱ्या पशुपालकांना नव्या सवलतींचा लाभ होणार आहे.

पशुसंवर्धन विषयक व्यवसायासाठी वीज दर आकारणी कृषी वर्गवारीप्रमाणे करण्यास मान्यता मिळाल्यानं कृषिसारख्याच वीजदर सवलती या व्यवसायांना मिळणार आहेत, या निर्णयामुळे राज्यातील पशुसंवर्धन क्षेत्रात क्रांती घडेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी व्यक्त केला आहे.

****

परभणी जिल्ह्यातल्या पाथरी तालुक्यातल्या पाथरगव्हाण बुद्रुक इथं शेतात काम करताना विद्युत प्रवाह उतरलेल्या वीज खांबावरील तणाला स्पर्श झाल्यामुळे प्रल्हाद घाडगे या अल्पभूधारक शेतकऱ्याचा काल मृत्यू झाला. या शेतकऱ्याचे दोन बैलही यावेळी दगावले. तर परवा लातूर इथं हातातल्या लोखंडी पाईपचा वीजवाहिनीला स्पर्श झाल्यामुळे वीजेचा धक्का लागून सूरज गायकवाड आणि अंकुश कांबळे या दोघांचा मृत्यू झाला.

****